
# बीड जिल्हा रुग्णालयाची बदनामी करणाऱ्या तत्कालीन जिल्हा शल्यचिकित्सकांनी डॉ.संजय राऊत व डॉ.संतोष शहाणे यांचा आदर्श घ्यावा!


अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ

सायं.दैनिक महाराष्ट्र

# आरंभ

संपादक : दिपक थोरात Mob.9860898564


■ बीड (महाराष्ट्र) ■ सायं.दैनिक ■ मराठी ■ वर्ष – ०२ ■ अंक – २०९ ■ गुरूवार दि.१७ एप्रिल २०२५ ■ आरएनआय – एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ ■ किंमत ३ रू. । पाने ४

■ Beed (Maharashtra) ■ Daily Evening ■ Marathi ■ Year - 02 ■ Issue - 209 ■ Thursday Dt.17 April 2025 ■ RNI : MAHMAR/2023/83965 ■ Price - 3 Rupees ■ Pages 4


# जिल्हा रुग्णालयातील आयसीयुमध्ये रुग्णांना दर्जेदार रुग्णसेवा..!

## बीड जिल्हा रुग्णालयातील डॉक्टर, सिस्टर, ब्रदर मामा–मावशींनी साप चावलेल्या महिलेला मृत्यूच्या दारातून वाचवले

## जिल्हा रुग्णालयाच्या नावाने बोंबाबोंब मारणाऱ्यांनो, उघडा डोळे बघा नीट!

- तीन लाखांपेक्षा जास्त खर्च असलेल्या पेशंटला डॉ.निलेश मिसाळ व सर्व टीमने दिले जीवनदान!
- खाजगी रुग्णालयात तीन लाखांपेक्षा जास्त आला असता खर्च; रूग्णाच्या नातेवाईकांकडून कौतुकाची थाप!
- जिथं रक्ताचं नातं संपत, तिथं शब्दाचा नातं सुरू होतं असाच प्रकार बीडच्या जिल्हा रुग्णालयात पाहायला मिळत आहे!





बीड । प्रतिनिधी

जिथे रक्ताचं नातं संपतं. तिथं विश्वासाचं नातं आणि शब्दाचा नातं समोर येतं, आणि ते नातं आयुष्यभरासाठी एकजूट होतं. असाच एक प्रकार सध्या बीडच्या जिल्हा रुग्णालयात पाहायला मिळत आहे. गंभीर स्वरूपाचे आजार असलेले पेशंट असो, किंवा डिलिव्हरीसाठी आलेले पेशंट असेल, बीड जिल्हा रुग्णालयात येणाऱ्या माता–भगिनींसाठी व ग्रामीण भागातील विषारी औषध प्राशन केलेले पेशंट व शेतीमध्ये काम करत असताना रात्रीच्या वेळी सर्पदंश, विचूदंश झालेल्या वेगवेगळ्या आजाराने ग्रस्त झालेले पेशंट बीड जिल्हा रुग्णाला दाखल होत आहेत. आणि यांना सुखरूप करण्याचे काम या जिल्हा रुग्णालयातील तज्ञ डॉक्टर आणि सर्व स्टाफ तसेच कर्मचारी करत आहे.











बीड जिल्हा रुग्णालयात आयसीव्ही मध्ये गेल्या आठ ते दहा दिवसांपासून एक महिला पेशंट मृत्यूशी झुंज देत होती. संबंधित पेशंट हे शेतकरी कुटुंबातील महिला असून या महिलेला घोणस नावाचा भला मोठा विषारी साप चावला होता. संबंधित महिलेची खाजगी रुग्णालयात जाण्यासारखी परिस्थिती नव्हती. म्हणून त्यांना बीड जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. या नातेवाईकाचं व सामाजिक कार्यकर्त्यांचा असं म्हणणं आहे की, बीड जिल्हा रुग्णालयात अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक पदी असलेले डॉ.संजय राऊत हे फिजिशन मेडिसिन तज्ञ आहेत. तर अतिरिक्त जिल्हा शलचिकित्सक पदी असलेले डॉ.संतोष शहाणे हे स्थिर रोग तज्ञ आहेत. या दोन्ही डॉक्टरांचा गेल्या दहा ते पंधरा वर्षांपूर्वीचा पेशंटला पाहण्याचा अनुभव आणि मोठ्या शस्त्रक्रिया असतील किंवा जास्त गंभीर स्वरूपाचे सिरियस पेशंट असतील. यांचा जीव वाचवण्यासाठी यांचा अनुभव कामी येत आहे. त्यामुळे बीड जिल्ह्यातील जनता ही जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.संजय राऊत व डॉ.संतोष शहाणे यांच्या जोडीचे व संबंधित बीड जिल्हा रुग्णालयातील डॉक्टर, सिस्टर, मामा–मावशी यांच्या कार्याचे कौतुक व समर्थन करून त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहून त्यांनी केलेल्या रुग्णसेवेची कौतुक करत आहे.

शस्त्रक्रिया करण्यात आलेल्या महिलेला बीडच्या जिल्हा रुग्णालयात आता चांगला इलाज मिळाल्यामुळे संबंधित महिलाचे नातेवाईक दैनिक महाराष्ट्र आरंभला बोलताना सांगितले की, आम्हाला सरकारी दवाखान्यांमध्ये एकदम खाजगी मध्ये असल्यासारखं वाटलं, या ठिकाणचे डॉक्टर यांनी खूप समजावून सांगितले. आणि चांगल्या पद्धतीने इलाज करून दिला. आम्हाला एक रुपयाचे औषध बाहेरून आणून दिले नाहीत. चांगल्या प्रकारे या ठिकाणचे सिविल सर्जन असतील, डॉक्टर फिजिशन निलेश मिसाळ व आयसीयू येथील सिस्टर, ब्रदर, मामा–मावशी या सर्वांनी आम्हाला खूप सहकार्य केले. आमचा पेशंट आज बीड जिल्हा रुग्णालयातील डॉक्टर व सिस्टर ब्रदर मामा यांच्यामुळे जिवंत आहे. आम्ही त्यांचे आभार मानत आहोत. असे पेशंटच्या नातेवाईकांनी यावेळी बोलताना


पान २ वर





### डॉ.निलेश मिसाळ, डॉ. एस.एम. बिलाल व डॉ.गझाला दस्तगीर सय्यद यांचे रुग्णांना मोलाचे योगदान





बीडच्या जिल्हा रुग्णालयात डॉ.निलेश मिसाळ, डॉ.बिलाल यांचे रुग्णांना मोलाचे सहकार्य लाभले आहे. डॉ. बिलाल यांनी २४ तास उभा राहून संबंधित पेशंट वरती विशेष लक्ष देऊन सेवा केली आहे. डॉ.बिलाल हे सदैव सर्व पेशंटला मदत करणारे डॉक्टर म्हणून डॉक्टर बिलाल यांची ओळख आहे. तर फिजिशियन निलेश मिसाळ हे मनमिळाऊ व सर्वसामान्यांसाठी एखाद्या पेशंटला स्वखर्चाने बाहेरून काही मेडिकल लागलं तर आणून देणारे डॉक्टर म्हणून त्यांची ओळख जिल्हा रुग्णालयामध्ये कमी दिवसांमध्ये डॉ. निलेश मिसाळ हे लोकप्रिय डॉक्टर म्हणून ओळखले जात आहेत. डॉ.गझाला दस्तगीर सय्यद व डॉ.एस.एम. बिलाल हे डॉक्टर पती पत्नी आहेत. आता नव्यानेच यांनी बीड जिल्हा रुग्णालयांमध्ये एक वेगळ्या प्रकारची छाप निर्माण केलेली आहे. तर त्यांच्या साथीसाठी आता डॉ. बिलाल व सय्यद गजाला आणि फिजिशियन डॉ.निलेश मिसाळ यांनी या रुग्णाचे प्राण वाचविले आहेत. त्याबद्दल बीड जिल्ह्यातील जनतेकडून यांच्या कार्याचं कौतुक होत आहे.

# बीड जिल्ह्यात सीआयआयआयटी स्थापन करण्याचा निर्णय

## पालकमंत्री अजित पवारांच्या घोषणेनंतर २ आठवड्यांतच निर्णय



मुंबई । प्रतिनिधी
बीड जिल्ह्यातील विद्यार्थी, युवकांना औद्योगिक प्रशिक्षण, तांत्रिक कौशल्यविकासाच्या माध्यमातून उद्योगक्षम बनविण्यासह रोजगार, स्वयंरोजगाराची संधी उपलब्ध करुन देण्यासाठी ‘सेंटर फॉर इन्व्हेंशन, इनोव्हेशन, इक्युबेशन ॲन्ड ट्रेनींग’ अर्थात (सीआयआयआयटी) स्थापन करण्याची घोषणा उपमुख्यमंत्री तथा बीडचे पालकमंत्री अजित पवार यांनी केल्यानंतर अवघ्या दोन आठवड्यांच्या आतच ‘टाटा टेक्नॉलॉजी’ कंपनीने बीड जिल्ह्यासाठी १९१ कोटी रुपये खर्चून नवीन ‘सीआयआयटी’ स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. तशा आशयाचे पत्र कंपनीने उपमुख्यमंत्री अजित पवार यांना पाठविले आहे. नव्या सेंटरमधून दरवर्षी ७ हजार युवकांना प्रशिक्षित केले जाईल, त्यातून बीड जिल्ह्यात उद्योगपुरक वातावरण निर्माण होण्यास मदत होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.
उपमुख्यमंत्री अजित पवार हे त्यांच्या निर्णयक्षम कार्यपद्धतीसाठी ओळखले जातात. धडाडीने निर्णय घेणे आणि नियोजित वेळेत यशस्वी अंमलबजावणी करणे, अशी त्यांच्या कामाची पद्धत आहे. त्याचा प्रत्यय पुन्हा आला आहे. बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री म्हणून जिल्हावासियांच्या अजित पवार यांच्याकडून अनेक अपेक्षा आहेत. उपमुख्यमंत्री अजित पवार त्या अपेक्षांवर खरे उतरताना दिसत आहेत. पालकमंत्री म्हणून आजित पवार यांनी २ एप्रिल २०२५ रोजी केलेल्या बीड जिल्ह्याचा दौऱ्यात बीड जिल्ह्यातील युवकांसाठी उद्योग क्षेत्राच्या मदतीने ‘सेंटर फॉर इन्व्हेंशन, इनोव्हेशन, इक्युबेशन ॲन्ड ट्रेनींग’ (सीआयआयआयटी) स्थापन करण्याची घोषणा केली होती. त्याअनुषंगाने त्यांनी ‘टाटा टेक्नॉलॉजी’ कंपनीला पत्र लिहून सहकार्य करण्याचे आवाहन केले होते.
उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पत्राला ‘टाटा टेक्नॉलॉजी’ कंपनीने सकारात्मक प्रतिसाद दिला असून बीड जिल्ह्यासाठी १९१ कोटी रुपये खर्चून नवीन ‘सीआयआयटी’ स्थापन करण्याची तयारी दर्शविली आहे. १९१ कोटींपैकी १५ टक्के म्हणजे ३३ कोटी रुपयांचा खर्च बीड जिल्हा प्रशासन करणार असून उर्वरीत खर्च ‘टाटा टेक्नॉलॉजी’ आणि त्यांच्या भागीदार कंपन्या, संस्था उचलणार आहेत. ‘टाटा टेक्नॉलॉजी’ कंपनीने ‘सीआयआयआयटी’ स्थापन केल्यानंतर दरवर्षी सुमारे ७ हजार युवकांना उद्योगांच्या (४.०) गरजेनुसार आवश्यक जागतिक दर्जाचे औद्योगिक, तांत्रिक प्रशिक्षण दिले जाणार आहे. यामुळे उद्योगांना त्यांच्या गरजेनुसार प्रशिक्षित मनुष्यबळ मिळेल तसेच युवकांना त्यांच्या इच्छेप्रमाणे रोजगार मिळवणे, स्वयंरोजगार करणे शक्य होणार आहे.
‘सीआयआयआयटी’च्या स्थापनेनंतर पहिल्या तीन वर्षांसाठी प्रशिक्षणाचा खर्च ‘टाटा टेक्नॉलॉजी’ उचलणार आहे. त्यानंतर प्रशिक्षणाचा खर्च ‘टाटा टेक्नॉलॉजी’ आणि जिल्हा प्रशासन दरवर्षी प्रत्येकी पन्नास टक्क्यांप्रमाणे विभागून उचलणार आहेत. यामुळे बीड जिल्ह्यातील हजारो युवकांना उद्योगक्षेत्राच्या गरजेप्रमाणे औद्योगिक, तांत्रिक प्रशिक्षण मिळेल. त्यांची कौशल्यवृद्धी होईल. उद्योगांना त्यांच्या गरजेप्रमाणे प्रशिक्षित मनुष्यबळ मिळेल. यातून जिल्ह्यात उद्योगपुरक वातावरण निर्माण होण्यास मदत होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे. उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांच्या या धडाकेबाज, निर्णयक्षम कार्यपद्धतीबद्दल जिल्ह्यातील नागरिकांकडून आनंद, समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

# ज्योत शिक्षणाची लावून गेली स्त्रियांचे कैवारी ते ज्योतिबा फुले

## गायिका शितल साठे यांचा भीम गीताचा सोनपेठ नगरीत कार्यक्रम

सिरसाळा । प्रतिनिधी
दिनांक १६ या दिवशी सोनपेठ या ठिकाणी आंबेडकर जयंतीच्या उत्सव समिती यांनी भीम गीतांचा कार्यक्रम घेतलेला आहे या कार्यक्रमाचे अध्यक्ष सोनपेठ नगरपालिकेचे नगराध्यक्ष चंद्रकांत राठोड हे होते व सोनपेठ नगरीमध्ये भीम गीतांचा कार्यक्रम झाला शाहीर शीतल साठे शाहीर सचिन माळी व यांनी दणदणीत कार्यक्रम भीमसैनिकांना दाखवला गेला आहे जयंती समितीचे संयोजक एडवोकेट व जयंती कमिटीचे अध्यक्ष अशोक तिरमले मारुती रंजवे उत्तम मुंडे यांनी कार्यक्रम घेण्यात आला होता.
यावेळी उपस्थित सोनपेठ नगरीचे माजी नगराध्यक्ष



चंद्रकांत राठोड मराठवाडा पी आर पी अध्यक्ष उत्तम मुंडे हे उपस्थित होते व भीमसैनिक उपासक उपासिका सर्व महिला मंडळ यावेळी उपस्थित होते व कार्यक्रमाचे स्वागत या कार्यक्रमात सोनपेठ नगरीचे दोन सैनिक उपस्थित होते.

# भगवान बाबा प्रतिष्ठान येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती उत्साहात साजरी

बीड । प्रतिनिधी
महामानव, भारतरत्न, बोधिसत्व, संविधानाचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती प्रतिवर्षी प्रमाणे याही भगवान बाबा सामाजिक प्रतिष्ठान येथे मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून गंमत भंडारी, पोलीस उपनिरीक्षक पानपाटील यांची उपस्थिती लाभली. प्रथम डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर व छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून सामूहिक बुद्ध वंदना घेऊन सामूहिक अभिवादन करण्यात आले. महामानवाच्या जयंती निमित्त भगवान बाबा प्रतिष्ठान येथे बालकासाठी विविध स्पर्धेची आयोजन केले होते. यावेळी महावितरण इंजिनियर कांबळे यांनी डॉ. आंबेडकरांच्या जीवनावर प्रकाश टाकत शिक्षणाचे महत्त्व पटवून देत डॉ. आंबेडकरांनी देशातील महिला व नागरिकांसाठी विविध सवलती,



शिक्षण व आरक्षणाबाबत माहिती दिली.
यावेळी शहरातील नेते मंडळी, पत्रकार, व्यापारी तसेच मित्रपरिवार यानी उपस्थित राहून अभिवादन करत सामाजिक एकोपे चे दर्शन घडवले. या कार्यक्रमात लहानथोर मंडळीसह महिलांची उपस्थित लक्षणीय होती. सामाजिक उपक्रम राबवून अभिवादन करण्यात येणार आले. यावेळी समीर काझी, होळकर, माजी नगरपरिषद सभापती विनोद मुळूक, नगरसेवक मुखिद लाला, माजी नगरसेवक सुधीर भांडवले, राष्ट्रवादीचे नेते बाबासाहेब घुगे, मनसेचे शहराध्यक्ष सोमेश्वर कदम, टायगर ग्रुप जिल्हाध्यक्ष राकेश जाधव, राजू जोशी, सतीश राऊत, वीरेंद्र शेळके, सरफराज शेख (सिव्हिल कॉन्ट्रॅक्टर) यांचे स्वागत करण्यात आले.
प्रा.टाकणखार, प्रा.राजु कोरडे, वैभव लोंढे, प्रा.अरुण मुंडे, प्रा.सदाशिव बिडवे, वाघमारे, विलास कोरडे, केचाळे, वायबसे, ॲड.लघाणे, निलेश गलधर, लाला महाकुंडे राजू ढोलेराजू डोळस, पिंटू मिसळे, सौरभ बन्सोडे, सौरभ मुंडे, नामदेव जोगदंड, सुंदर भिसे, सोनू भोले, समर्थ दळवीसह सौ. वैशालीताई कोरडे, किरण डोळस, मोनिका बेद्रे सह भगवान बाबा सामाजिक प्रतिष्ठान येथील नागरिक व महिलांही उपस्थित राहुन डॉ.आंबेडकरांना अभिवादन केले.

# पिंपळनेर येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची साजरी



पिंपळनेर । प्रतिनिधी
बीड तालुक्यातील पिंपळनेर येथील श्री गणेश सार्वजनिक वाचनालयात संकल्प सेवाभावी संस्था व श्री गणेश सार्वजनिक वाचनालय यांच्या वतीने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी मान्यवरांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.
डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती समितीचे अध्यक्ष अनिल सिरसट तर प्रमुख पाहुणे म्हणून अशोक होळकर, सुभाष देवडे, प्रदीप आणेराव सह आदी उपस्थित होते. यावेळी प्रमुख मान्यवरांनी मनोगत व्यक्त करून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याला उजळा दिला. या कार्यक्रमाला राजेश गवळी, नरेश वंजारे, रवि पवार, बळीराम मेहत्रे, श्रीकांत ठोकरे, शहादेव जाधव, मच्छिंद्र तिरगुळ, श्रीराम पवार, रितेश गवळी, मच्छिंद्र साठे सह नागरिक उपस्थित होते.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर आधारित बोधिसत्व धम्म ज्ञान स्पर्धा संपन्न

बीड । प्रतिनिधी
विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीच्या अनुषंगाने भारतीय बौद्ध महासभेच्या वतीने डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर आधारित बोधिसत्व धम्मज्ञान परिक्षेचे आयोजन हे दिनांक १३ एप्रिल २०२४ रोजी संपन्न झाले.
या बोधीसत्व धम्म ज्ञान परीक्षेत मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर जयंतीच्या निमित्त बोधिसत्व धम्मज्ञान स्पर्धेचे हे पहिलेच वर्ष असून तरीही मोठ्या प्रमाणात विद्यार्थी उपस्थित असल्याचे पहावयास



मिळाले. आयोजकांनी यावेळी माहिती देताना सांगितले की हा उपक्रम संपूर्ण भारतभर भारतीय बौद्ध महासभेच्या वतीने राबवण्यात येत असून इथून पुढे प्रत्येक वर्षी हा उपक्रम राबवण्यात येणार असल्याचेही यावेळी सांगितले. यावेळी भारतीय बौद्ध महासभेचे अमरसिंह ढाका, कॅप्टन राजाभाऊ आठवले, बौद्धाचार्य सदाशिव कांबळे, समता सैनिक विशाल व विद्यार्थी विद्यार्थिनी उपस्थित होते.

# खाकी मधल्या वर्दीतला दर्दी माणूस नक्की वाचा...!

आपल्याकडे एक म्हण आहे आपण कोर्टाची पायरी, दवाखान्याची पायरी, पोलीस स्टेशनची पायरी चढू नये, कारण या तिन्ही पायऱ्यांमध्ये खूप लोकांना भीती वाटते. आज मादळमोही पोलीस स्टेशनचे रुजू असलेले जमादार यांचा कालखंड गेल्या चार-पाच वर्षाचा त्यांच्याबद्दल थोडंसं...!
मादळमोही करांनी अनुभवले आहे व त्या अनुभवांमध्ये मादळमोहीकराच्या असे लक्षात आले की, मादळमोहीच्या परिसरात काही चुकीच्या गोष्टी घडल्या, तर पोलीस स्टेशनमध्ये आल्यावर अथवा ज्या ठिकाणी त्या घडल्या, त्या ठिकाणी जाऊन, मग तो बांध असो, कोणाचं दार असो किंवा कोणताही स्पॉट असो, तेथे शांतपणे ऐकून सत्याच्या बाजूने आपली परखड भूमिका घेणारे तसेच दोन्ही बाजूने विचार करून दोघांनाही समान न्याय देणारे, योग्य मार्गाने चुकीच्या गोष्टीला चूक म्हणून, बरोबर असलेल्या गोष्टीला बरोबर म्हणून, कोणतेही प्रकरण मार्गी लागावे व न्याय निवाडा व्हावा यासाठी साहेब कायम तत्पर राहिले.



तसेच कोणाचही मन न दुखवता दोन्ही बाजूंचा समविचार करून आपली भूमिका चोखपणे पार पाडणारे ज्यांची सर्वांसोबतच ओळख, कारण ज्या क्षेत्रात ते काम करतात त्या क्षेत्राची शिकवण आहे, कोणत्या लोकांत बसायचं व कोणत्या लोकात उठायचं तसेच कोणावरही अन्याय होऊ नये व कोणावरही अत्याचार होऊ नये यासाठी योग्य भूमिका घेणारे मादळमोही पंचकर्षित ज्यांच्या वर्दीची चांगली वचक आहे, असे खाकी मधल्या वर्दीतला दर्दी माणूस...
म्हणजेच मादळमोही पोलीस स्टेशन सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक श्री राजाभाऊ गर्जे साहेब यांची पीएसआय पोलीस उपनिरीक्षक पदी निवड झाल्याबद्दल अभिनंदन, त्यांचे स्वागत करण्यात मादळमोही पंचक्रशी सहभागी आहे. कारण चांगल्याला चांगलं म्हणणं ही आपली संस्कृती व कर्तव्य आहे. म्हणून मादळमोहीतील गर्जे साहेबांवर प्रेम करणाऱ्या सर्वच मादळमोही करांनी साहेबांचं स्वागत केलेलं आहे...
त्याच हेतूने आज मादळमोही नगरीचे युवा माझी ग्रामपंचायत सदस्य श्री निलेश भैय्या भोपळे व युवा नेते माननीय श्री संभाजी हक्कदार, मित्र भागवत राजगुरू व आपला सुरेश भोपळे त्यांचे स्वागत करताना व त्यांना पुढील कार्यास व पुढील वाटचालीस शुभेच्छा देताना. त्यांचं कार्य असंच बहरत जावो व त्यांच्या हातून आजपर्यंत जो न्याय निवाडा झाला, कोणाचही मन न दुखवता तो कायम टिकून राहावा व त्यांच्या कार्यात नेहमी त्यांना यश मिळत राहावं हीच ईश्वरचरणी सदिच्छा धन्यवाद...!

# वक्फ बोर्ड बिलविरोधात मुस्लिम पर्सनल लॉ बोर्डकडून मानवी साखळी आंदोलन

बीड । प्रतिनिधी
वक्फ बोर्ड बिलचा जोरदार विरोध करत ऑल इंडिया मुस्लिम पर्सनल लॉ बोर्डच्या वतीने संपूर्ण देशभरात मानवी साखळी आंदोलन सुरू करण्यात आले आहे. याचाच एक भाग म्हणून आज बीड येथील छत्रपती शिवाजी महाराज क्रिडांगण येथे हजारो मुस्लिम बांधवांनी एकत्र येत आपला निषेध नोंदवला. या आंदोलनामध्ये सहभाग घेतलेल्या नागरिकांनी शांततामय मार्गाने वक्फ बोर्ड बिलविरोधात आपली भूमिका मांडली. यावेळी प्रसिद्ध धार्मिक वक्ते मुफ्ती मोहियोद्दीन यांनी आंदोलनकर्त्यांना वक्फ बिलाचे परिणाम व त्यातील तरतुदी याविषयी मार्गदर्शन केले.
या आंदोलनाच्या माध्यमातून केंद्र सरकारने वक्फ बोर्ड संदर्भातील नवे विधेयक मागे घ्यावे, अशी मागणी जोर धरू लागली आहे.मुस्लिम समाजाच्या धार्मिक आणि सामाजिक हक्कांवर घाला घालणाऱ्या या बिलाचा तीव्र निषेध करत, देशभरात एकजूट दाखवत मुस्लिम बांधव आंदोलनाच्या माध्यमातून आपला आवाज बुलंद करताना दिसत आहे. वक्फ बिल विषय लोकांना मार्गदर्शन केले तसेच आज पासून सुरू झालेल्या मानवी साखळी आंदोलन दररोज प्रत्येक तालुक्यात होणार असल्याचा सांगण्यात आला आहे. बीड जिल्हयातील नेत्यांसह मराठा समाजाच्या नागरिकांना ही आपली उपस्थिती मोठ्या प्रमाणावर दर्शवली आहे.
यावेळी मौलाना अब्दुल रहीम, मौलाना हाफिज जाकीर, मौलाना अखिल, शफीक हाशमी, मौलाना अब्दुल बाखी, मुफ्ती जावेद, मुफ्ती आरीफ साहेब, मौलाना अमिन, मौलाना साबीर, मुफ्ती गय्यास, मुफ्ती युनूस, मुफ्ती मैनुद्दीन कासमी यांच्यासह बीड विधान सभेचे आ. संदीप क्षिरसागर, सय्यद सलीम, अशोक हिंगे, गणेश वरेकर, ड. शफीक भाऊ, नितीन जयभाय, मोईन मास्टर, फरोक पटेल, खुर्शिद आलम, रविंद्र दळवी, देशमुख, आदी मोठ्या संख्येने मुस्लिम बांधव उपस्थित होते.

पान १ वरून...

## जिल्हा रुग्णालयातील आयसीयुमध्ये रूग्णांना दर्जेदार रुग्णसेवा..!

सांगितले. तसेच जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.संजय राऊत व अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.संतोष शहाणे यांच्याकडून रुग्णाला सर्व परिस्थितीतील लागणारे मेडिकल देण्यात आले. शस्त्रक्रिया झाल्यानंतर त्या ठिकाणी त्यांना चांगल्या प्रकारचे सुविधा देऊन त्यांचा जीव वाचवणे आमचं कर्तव्य आहे असे जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.संजय राऊत व डॉ.संतोष शहाणे यांनी म्हटले आहे.
साप चावलेल्या सदरील महिलेला, कुलकर्णी शीला, उबाळे वंदना, चव्हाण प्रमिला, कथले वैजनाथ, गिरी अमिता, सानप पूजा, वाघमारे अनुराधा, जाधव कीर्ती, अन्वने गजानन, सुतार चंद्रकला, कांबळे प्राणली, जगताप प्रियंका, धवन अंजली, मेहकर अभय, परतवाळे आरती, कैतके काजल, केकान अलका, रवींद्र सौदा, येवले भाऊसाहेब, अनिल शिंदे, इरफान पठाण, काकडे हनुमान, उबाळे प्रदीप, ओंकार काले, विभागातील डॉक्टर व सर्व स्टाफने सदरील महिला पेशंटची काळजी घेऊन मोठे सहकार्य करून मृत्यूच्या दारातून बाहेर काढून नवा जन्म दिला आहे. यामुळे या सर्व स्टाफचे सर्व स्तरावरून कौतुक होत आहे.

# मेरा ई केवायसी ॲप वापरा आणि रेशन कार्डची घरच्या घरी केवायसी करून घ्या : तहसीलदार चंद्रकांत शेळके

केंद्र व राज्य शासनाने रेशन लाभार्थ्यांना ई-केवायसी बंधनकारक केली आहे. केवायसीला आता ३० एप्रिलपर्यंत मुदतवाढ मिळाली आहे. आता घरबसल्या लाभार्थी आपली ई-केवायसी मोबाइलद्वारे करू शकतील.

सर्वोच्च न्यायालय तसेच केंद्र सरकारने राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेतील सर्व लाभार्थ्यांची ई-केवायसी पडताळणी करण्याच्या सूचना यापूर्वीच राज्य सरकारला केल्या आहेत. त्यानुसार राज्यातील सर्व रास्त भाव दुकानांवर ई-केवायसी मोहीम हाती घेऊन ही कार्यवाही तातडीने पूर्ण करण्याची सूचना सर्व क्षेत्रीय कार्यालयांना दिल्या होत्या. राज्य शासनाने रेशन लाभार्थ्यांना केवायसी करण्यासाठी वेळोवेळी मुदतवाढ दिली आहे. यापूर्वी केवायसी करण्यासाठीची १५ मार्च ही मुदत होती, ती आता ३१ मार्च करण्यात आली होती. आता त्यास पून्हा ३० एप्रिलपर्यंत मुदतवाढ दिली आहे.

त्यानुषंगाने बीडचे जिल्हाधिकारी अविनाश पाठक, जिल्हा पुरवठा अधिकारी ओंकार देशमुख यांनी जिल्ह्यातील उर्वरित लाभार्थी यांचे केवायसी तातडीने पूर्ण करून घेण्याबाबत सूचना केल्या आहेत. बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी मेरा ई केवायसी ॲप सोप्या पद्धतीने कसे वापरावे याबाबत सविस्तर माहिती दिली आहे. यानुसार लाभार्थ्यांना ई केवायसी करून घेणे सोपे होईल.

अशी करा ई केवायसी : -

१) तुमच्या मोबाईलमध्ये मेरा ई केवायसी प इंस्टॉल करा.
२) ॲप ओपन करा, पला कॅमेरा आणि लोकेशन वापरण्याचे परमिशन द्या.
३) फेस आर डी ॲप इन्स्टॉल करा.
४) राज्य निवडा. व्हेरिफाय लोकेशन या बॅटणावर क्लीक करा.
५) आधार नंबर टाकून जनरेट ओटीपी या बटनावर क्लिक करा.
६) आधार नंबरला लिंक असलेल्या मोबाईलवर आलेला ओटीपी आणि कॅपच्या कोड टाकून सबमिट बटनावर क्लिक करा.
७) तुमच्या राशन कार्डवरचा सर्व तपशील दिसेल, त्याखाली फेस ई केवायसी हे बटन



दिसेल, त्यावर टच करा.
८) कंसेन्ट अक्सेप्ट करा. फेस आर डी ला कॅमेरा वापरण्याची परमिशन द्या. कॅमेरा कसा वापरावा या संदर्भातील काही सूचना या ठिकाणी दिसतील त्या सविस्तर वाचून घ्या.
९) चौकटीत टीक करा, प्रोसीड या बटणावरती टच करा.
१०) फोटो कॅप्चर करा. झाली तुमची ई केवायसी

बीडच्या उपविभागीय अधिकारी कविता जाधव यांनी वेळोवेळी उर्वरित लाभार्थ्यांची रेशन कार्ड केवायसी करून घेण्याबाबत स्वस्त धान्य दुकानदारांना सूचना केलेल्या आहेत. बीडचे पुरवठा निरीक्षण अधिकारी प्रशांत सुपेकर यांनी दिलेल्या माहितीनुसार बीड तालुक्यात प्राधान्य कुटुंब योजनेचे ६३४८१, अंत्योदय अन्न योजनेचे ७२९७, ए पी एल शेतकरी संख्या १९७८३, एन पी एच शिधापत्रिकाधारक संख्या ९५१५ तर शुभ्र शिधापत्रिका धारकांची संख्या १५६८ इतकी आहे. अशाप्रकारे तालुक्यात एकुण १ लाख १७२८ इतके शिधापत्रिका धारक आहेत. पुरवठा विभागाचे अव्वल कारकून संतोष मुळीक यांनी कळविल्यानुसार तालुक्यातील एकुण ३४८ स्वस्त धान्य दुकानातील ए पी एल शेतकरी १९७८३ पैकी ५८९८ शिधापत्रिकाधारक यांना डीबीटीची रोख रक्कम प्राप्त झाली असून प्रतिव्यक्ती १७० रुपयाप्रमाणे सुमारे पावणेचार कोटी रुपये महिला कुटुंब प्रमुख यांच्या खात्यात जमा झाले आहेत. काही शेतकरी लाभार्थी शिधापत्रिकाधारक यांचे बँक खाते केवायसी न केल्याने खात्यात रक्कम जमा झालेली नाही, तरी त्यांनी बँक खाते केवायसी करून घ्यावेत असे त्यांनी कळविले आहे.

ज्या एपीएल शिधापत्रिकाधारक शेतकरी यांनी तहसील कार्यालयात फार्म भरुन दिलेला नाही, त्या शिधापत्रिकाधारक यांनी आपल्या कुटुंबातील कर्त्या महिलेचे बँक पासबुक, आधार कार्ड व कुटुंबातील कोणत्याही एका सदस्याचा सातबारा तहसील कार्यालयात जमा करावा, असे आवाहन अव्वल कारकून सुरेश वायभट यांनी यावेळी केले.

पी एच एच व अंत्योदय अशा ७०७७८ कुटुंबातील ३ लक्ष २३३ लाभधारक (सदस्य) यांची ईकेवायसी स्वस्त धान्य दुकानदारांमार्फत करणे सुरू आहे. महत्वाचे म्हणजे कुटुंबातील सर्वच सदस्यांची ई केवायसी करून घेणे आवश्यक आहे. त्यापैकी ९० हजार लाभधारक यांची ई केवायसी अजूनही बाकी आहे.

ही सुविधा दिनांक ३० एप्रिलपर्यंत स्वस्त धान्य दुकानदार यांच्याकडेही उपलब्ध आहे जी सुविधा निशुल्क आहे. त्यासाठी कोणताही खर्च आकारण्यात येत नाही. याबद्दल बीड तालुक्यातील एकूण ३४८ स्वस्त धान्य दुकानदार यांना सूचित करण्यात आले आहे, असे यावेळी तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी आवर्जून नमूद केले.

तसेच जे शिधापत्रिकाधारक ई केवायसी करण्यास स्वस्त धान्य दुकानदार यांच्या कडे जाऊ इच्छित नाहीत, त्यांना मेरा ई केवायसी ॲप वापरून घरबसल्या आपण कुटुंबतील सदस्यांची ई केवायसी करता येऊ शकेल. जे पात्र लाभधारक हे शासनाने ठरवून दिलेल्या कालावधीत ई केवायसी करणार नाहीत, त्यांचे राशन बंद होणार आहे, याची सर्व पात्र अंत्योदय व पी एच एच शिधापत्रिका धारक यांनी नोंद घ्यावी असे आवाहन जिल्हा पुरवठा अधिकारी ओंकार देशमुख यांनी केले आहे.

## गेवराई बसस्थानक एक आदर्श व सुंदर स्वच्छतेसाठी विविध स्तुत्य उपक्रम राबविणे : बोर्डे

गेवराई । प्रतिनिधी

बस स्थानकात प्रवास करताना प्रवाशांना अनेक अडचणींना सामना करावा लागत आहे. निवेदनाद्वारे विविध मागणी नमूद केले आहेत त्यापैकी काही मागण्या तात्काळ आश्वासन देऊन सकारात्मकता दर्शविली. या संदर्भात गेवराईतील आगार कार्यालयात बीड येथील विभाग नियंत्रण माननीय अनुजा दुसाले यांना विविध मागण्यांचे निवेदन देण्यात आले. याप्रसंगी त्यांच्यासोबत विभाग वाहतूक अधिकारी राजकुमार दिगटे. शिवराज कराड इत्यादी उपस्थित होते. तसेच गेवराई येथील आगार प्रमुख श्री म्हस्के उपस्थित होते. सदरील निवेदन गेवराई ग्राहक पंचायत मार्गदर्शक केंद्रप्रमुख तथा बीड जिल्हा ग्राहक पंचायत उप जिल्हाध्यक्ष तसेच श्री जगदंबा ज्येष्ठ नागरिक सेवाभावी संस्था अध्यक्ष अनिल बोर्डे आणि गेवराई ग्रामपंचायत तालुका अध्यक्ष प्रा. फलके भानुदास इत्यादी उपस्थित होते.




सदरील निवेदन वाचल्या नंतर त्यातील काही मागण्या त्यांनी तात्काळ सोडविल्या जातील अशा प्रकारचे सकारात्मक आश्वासन त्याच क्षणी देण्यात आली त्यामुळे बीड येथील विभाग नियंत्रण माननीय अनुजा दुसाले यांचे अभिनंदन व कौतुक केले अशा प्रकारची अधिकार सर्व कार्यालया असतील तर सर्व कार्यालय गरुडछेप घेतील. याप्रसंगी याप्रसंगी त्यांनी नाशिक बस तात्काळ सुरू केली जाईल असे स्पष्ट सांगितले. याचबरोबर पोलीस चौकीच्या संदर्भात ही पण मागणी त्यांनी तात्काळ सुरू करण्यात येईल असे सांगितले. कारण की पोलीस चौकी असणे हे खूप महत्त्वाचे आहे असे त्यांनी स्वतः सांगितले व बस आगारा मार्फत राबविण्यात येणाऱ्या यूपी आय पेमेंटच्या माध्यमातून व्यवहार करणे हे पण त्यांनी गरजेचे आहे त्यासाठी आपण सर्वांनी जनजागृती करणे आवश्यक आहे यासाठी यूपीआय संदर्भात बस स्थानकामध्ये पोस्टर व फलक लावून जनजागृती करणे आवश्यक आहे नादुरुस्त बस किंवा नादुरुस्त तिकीट मशीन मार्गस्थ बस मध्ये देऊ नये बस मध्ये सर्व संयुक्त बसेस असाव्यात. बस स्थानक मोठ्या प्रमाणात विद्युत रोषणाई करण्यात यावी यावी. पोलीस चौकीमध्ये पोलीस मित्रांचे नाव भ्रमणध्वनी क्रमांक ठळक दिसेल अशा ठिकाणी लावणी आवश्यक आहे ज्येष्ठ नागरिक यांना बस मध्ये बसण्यासाठी आपण आपल्या स्तरावरून सर्व वाहकांना सूचना निर्गमित करण्यात यावी. बस स्थानक परिसरात सुंदरतेसाठी व उन्हाळ्याच्या सावलीकरिता वृक्षारोपण करणे हे पण त्यांनी तात्काळ जूनमध्ये करण्यात येईल अशा प्रकारचे आश्वासन दिले आहे या सर्व निवेदनातील स्तुत्य उपक्रमाची त्यांनी खूप कौतुक करून अभिनंदन केले.

बस स्थानकात स्वच्छता राहण्यासाठी ही सर्वांची जबाबदारी आहे त्याकरिता वर्षातून किमान दोन वेळेस शालेय मुलांची फेरी काढून जनजागृती संदेश देण्याचे आवश्यक आहे राज्य परिवहन महामंडळाच्या बस स्थानकावर हिंदू सम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छ सुंदर अभियानामध्ये आपल्या गेवराई बस स्थानकाच्या महाराष्ट्रात एक नंबर राहील कारण की अशा प्रकारच्या सर्व अधिकाऱ्यांनी सकारात्मक ऊर्जा देण्यात आली त्यामुळे पुनश्च एकदा बीड येथील विभाग नियंत्रक माननीय अनुजा दुसाले मॅडम व त्यांच्या सर्व अधिकारी वर्गांचे आभार व कौतुक करून अभिनंदन केले.

## श्री स्वामी समर्थ सेवा केंद्रात अखंड नाम जप यज्ञ सप्ताहाचे आयोजन

माजलगाव । प्रतिनिधी

श्री स्वामी समर्थ पुण्यतिथी निमित्त परमपूज्य गुरुमाऊलींच्या आशिर्वादाने येथील श्री स्वामी समर्थ सेवा केंद्रात दि २० ते २६ एप्रिल दरम्यान अखंड नाम जप यज्ञ सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे.



या सप्ताहात सात दिवसीय श्री गुरुचरित्र पारायण, अखंड प्रहरे, श्री गणेश याग, मनोबोध याग, चंडी याग, स्वामी याग, गीताई याग, रुद्र मल्हारी याग तसेच श्री नवनाथ भक्तिसार, सुलभ भागवत, श्रीपाद श्रीवल्लभ चरित्र, दररोज दुपारच्या वेळी सामुहिक श्री स्वामीचरित्र सारामृत, श्री दुर्गा सप्तशती, रुद्र पठण, श्री स्वामी समर्थ अखंड नामस्मरण, सांस्कृतिक कार्यक्रम, दररोज सायंकाळी सहा वाजता औदुंबर प्रदक्षिणा, दि. २६ रोजी श्री सत्यदत्त पूजन, बलिपुर्णाहुती सकाळी ठिक साडे दहा वाजता महानैवेद्य आरतीने सप्ताहाची सांगता होणार आहे.

या सप्ताहाच्या कालावधीत प्रश्नोत्तरे, ग्रामाभियान प्रशिक्षण, संपन्न होणार असून श्री गुरुचरित्र पारायण सेवेसाठी तसेच सप्ताहाच्या कालावधीत होणाऱ्या सर्व अध्यात्मिक सेवेत माजलगाव शहरासह तालुक्यातील सर्व साप्ताहिक व दैनिक केंद्रातील सेवेकरी, भाविक भक्त, नागरिक यांनी लाभ घ्यावा असे आवाहन समस्त श्री स्वामी समर्थ सेवेकरी माजलगाव च्या वतीने करण्यात आले आहे.

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती रुग्णांना फळ वाटप करून केली साजरी

धारूर । प्रतिनिधी

धारूर ग्रामीण रुग्णालय येथे विश्वभूषण परमपूज्य डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती रुग्णांना फळ वाटप करून साजरी करण्यात आली. सर्वप्रथम डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले यावेळी भारतीय बौद्ध महासभेचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते

याप्रसंगी रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी नितीन परदेशी डॉ.परवेज शेख भारतीय बौद्ध महासभेचे जिल्हा संघटक भीमरावजी सिरसट तालुका शाखा अध्यक्ष विष्णू तूपसागर सरचिटणीस कैलास साळवे संघटक सनी गायसमुद्रे भीम शाहीर कांबळे तसेच रुग्णालयातील स्टाफ मोठ्या संख्येने उपस्थित होता.



## अंबाजोगाई आता पुस्तकांचं गाव

अंबाजोगाई । प्रतिनिधी

मंत्री उदय सामंत यांनी बीड जिल्ह्यातील साहित्यिक, कलावंत यांच्या समवेत बैठक आयोजित केली त्यात अंबाजोगाईची पुस्तकाचं गाव म्हणून घोषणा केली. आद्यकवी मुकुंदराज आणि सर्वज्ञ दासोपंत या महान संत साहित्यिकाच्या कर्तृत्वाने, लिखाणाने आणि वास्तव्याने पुनीत झालेलं अंबाजोगाई आता पुस्तकांचे गाव म्हणून ओळखले जाईल. मुकुंदराज समाधी परिसरात आणि गावातील काही नागरिकांकडे ग्रंथालये उभारण्यात येणार आहेत. वाचन संस्कृती अधिक सक्षमपणे रुजवण्यासाठी हे केले जाणार आहे. बीडच्या साहित्यिकांनी सुचवलेल्या साहित्यासंबंधीच्या अनेक सूचना त्यांनी मान्य करत लवकरच पूर्तता करिन असे वचनही दिले.मराठी भाषेचा आदर राखला जाईल याकडेही गांभीर्याने लक्ष दिले जाणार असून त्यासाठी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमणार असल्याची माहितीही त्यांनी दिली. स्त्रीयांसाठी आणि मुलांसाठीची विशेष साहित्य संमेलनाचे आयोजन देखील केले जाणार आहे. बीडच्या प्रतिथयश साहित्यिकांनी यावेळी त्यांना आपली पुस्तके भेट दिली ती त्यांनी नम्रपणे स्वीकारली.




यावेळी संभाजीनगरचे खा.संदीपान भुमरे, जिल्हाधिकारी अविनाश पाठक, जिल्हाप्रमुख अनिल जगताप, जिल्हाप्रमुख सचिन मुळूक, डॉ.दिपाताई क्षीरसागर आदीसह इतर मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.

## उर्दू भाषेवरील जातीयतेचे मळभ न्यायालयाने केले दूर उर्दू फक्त मुस्लिमांची नाही तर भारतीय भाषा आहे

### सर्वोच्च न्यायालयाचा महत्त्वपूर्ण निकाल

बीड । प्रतिनिधी

उर्दू भाषेवरील जातीयतेचे मळभ शेवटी न्यायालयानेच दूर करत उर्दू फक्त मुस्लिमांची नाही तर भारतीय भाषा आहे असा निकष देत महत्त्वपूर्ण निकाल दिला आहे. यामुळे उर्दू भाषेला जातीयतेच्या चष्म्यातून पाहणाऱ्यांना जबरदस्त आणि कायमची चपराक बसली आहे. न्यायालयाच्या या निर्णयामुळे भाषा प्रेमींमधून समाधान व्यक्त केले जात आहे.




याविषयी थोडक्यात वृत्त असे की, महाराष्ट्राच्या अकोला जिल्ह्यातील पातूर नगर परिषदेच्या मंडळावर मराठीसह उर्दू भाषेच्या वापराला आव्हान देणारी याचिका माजी नगरसेविका वर्षा संजय बगाडे यांनी दाखल केली होती. सर्वोच्च न्यायालयाने ती याचिका फेटाळून लावत कडक टिप्पणी करत, भाषेला कोणताही धर्म नसतो आणि उर्दूला फक्त मुस्लिमांची भाषा मानणे हे भारताच्या वास्तवाचे आणि विविधतेमधील दुर्दैवी गैरसमज आहे. तत्पूर्वी प्रथम ही याचिका नगर परिषदेने आणि नंतर मुंबई उच्च न्यायालयाने सुद्धा फेटाळली होती. यामुळे सौ. बगाडे यांनी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली होती. या याचिकेवर सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती सुधांशू धुलिया आणि न्यायमूर्ती के. विनोद चंद्रन यांच्या खंडपीठाने निकाल देताना म्हटले की, भाषा ही कोणत्याही धर्माची नाही, तर एका समुदायाची, प्रदेशाची आणि लोकांची आहे. भाषा ही संस्कृती आहे. भाषेला धर्म नसतो आणि ती समाजाच्या सभ्यतेच्या प्रवासाचा एक मापदंड आहे. उर्दू भाषा ही भारताच्या भूमीवर जन्मास आली आहे. उर्दूला परदेशी भाषा किंवा फक्त एकाच धर्माची भाषा मानने पूर्णपणे चुकीचे आहे. उर्दूला परदेशी भाषा किंवा केवळ एका विशिष्ट धर्माची भाषा मानने पूर्णपणे चुकीचे आहे. महाराष्ट्र सार्वजनिक प्राधिकरण (अधिकृत भाषा) कायदा, २०२२ मध्ये उर्दू भाषेच्या वापरावर कोणतेही बंधन नाही, असे सर्वोच्च न्यायालयाने म्हणत उर्दू है मेरा नाम, मैं 'ख़ुसरो' की पहेली

क्यूँ मुझ को बनाते हो तअस्सुब का निशाना
मैंने तो कभी ख़ुद को मुसलमाँ नहीं माना
देखा था कभी मैंने भी ख़ुशियों का ज़माना
अपने ही वतन में हूँ मगर आज अकेली हा शेर

ही निकालात नमूद केला आहे. तसेच मराठीचा वापर अनिवार्य आहे, परंतु त्यासोबत इतर भाषांचा वापर प्रतिबंधित नाही. म्हणून ही याचिका कायद्याचा चुकीचा अर्थ लावण्यावर आधारित आहे आणि ती फेटाळण्यात येत आहे. असा महत्वपूर्ण निकाल उर्दू भाषेविषयी सर्वोच्च न्यायालयाने दिल्यामुळे उर्दू भाषेवरील जातीयतेचे मळभ एकदाचे दूर झाले आहे. तसेच उर्दू भाषेला जातीयतेच्या चष्म्यातून पाहणाऱ्यांना या निकालामुळे जोरदार चपराक बसल्याने भाषा प्रेमींमधून न्यायालयाने दिलेल्या या निकालाविषयी समाधान व्यक्त केले जात आहे.

**उर्दू भाषा ही अत्यंत गोड आणि भारतात जन्मलेली - सय्यद हसीन अख्तर**

उर्दू भाषेविषयी न्यायालयाने दिलेल्या या निर्णयाचे स्वागत करतो. या निर्णयाने एका चांगल्या शुद्ध भारतीय आणि गोड भाषेला न्यायालयाकडून न्याय मिळाला आहे. गेल्या काही वर्षांपासून जात्यांधांकडून उर्दू भाषेला वेठीस धरण्याचे धोरण या निकालामुळे आता बंद होतील. एका भाषेमुळे जाती-जातीत, समाजा-समाजात विष कालवण्याचे काम सुद्धा बंद होतील. यामुळे न्यायालयाच्या या निकालाचे मनापासून स्वागत आहे.

**वर्षा बगाडे यांचे मनापासून आभार - एस.एम.युसूफ**

काही गलिच्छ राजकारणी आपल्या सडक्या मेंदू आणि जातीयतेच्या नजरेतून उर्दू भाषेविषयी नेहमी नको ते उद्योग करीत होते. उर्दू भाषेचे कोलीत करून असे लोक नगर परिषदा, पंचायत समित्या, जिल्हा परिषदा किंवा तत्सम शासकीय-प्रशासकीय कार्यालयांमध्ये उर्दू भाषेतून नाम फलक लावण्यास सुद्धा मज्जाव करायचे. यामुळे समाजातील वातावरण बिघडत असे. मात्र अशांचे जातीय राजकारण मस्तपैकी चालायचे. आता मात्र सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या या निकालामुळे अशा उपटसुंभांच्या समाज विघातक कृती पासून जनतेला सुटका मिळाली आहे. माजी नगरसेविका वर्षा बगाडे यांनी उर्दू भाषेच्या आकसापोटी नगर परिषदेपासून सुरू केलेला वाद न्यायालय, उच्च न्यायालय आणि सर्वोच्च न्यायालयापर्यंत नेला. यावर सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या ऐतिहासिक व महत्त्वपूर्ण निकालामुळे जातीय विष पेरणाऱ्यांच्या राजकारणावर आता कायद्याचा अंकुश लागेल. यामुळे वर्षा बगाडे या उर्दू विरोधी असल्या तरी त्यांच्यामुळेच हा ऐतिहासिक निकाल लागल्याने त्यांचे मनापासून आभार.

# पावणे पाच कोटी खर्चुनही टाकरवणकरांना विकतच्या पाण्यावर भोगावी लागते तहान

## जलजीवनच्या बोगस कामाच्या चौकशीसाठी १ मे ला गावकऱ्यांचे बेमुदत धरणे आंदोलन : कपिल आडागळे

टाकरवण । प्रतिनिधी

जलजीवन मिशन योजनेतून टाकरवन येथे पावणे पाच कोटी रुपये खर्चुन पाणीपुरवठा योजना राबविण्यात आली आहे. अपूर्ण कामामुळे नळाला पाणी येत नसल्याने भर उन्हाळ्यात पाणीटंचाईचा सामना करावा लागत असून गावकऱ्यांना विकतच्या पाण्यावर तहान भागवी लागते. बोगस कामाच्या चौकशीसाठी एक मे रोजी ग्रामपंचायत कार्यालय टाकरवन येथे गावकऱ्यांच्या वतीने धरणे आंदोलन करण्यात येणार आहे. यासंबंधीत जिल्हाधिकारी व संबंधित अधिकारी गुत्तेदार व आमदार विजयसिंह पंडित यांना निवेदन दिले आहे. माजलगाव तालुक्यातील टाकरवन हे अंदाजे १५ हजार लोकसंख्येचे गाव आहे. गावातील पाणीटंचाई दूर होण्यासाठी व पिण्यासाठी शुद्ध पाणी मिळण्यासाठी केंद्र व राज्य सरकारकडून जल जीवन मिशन योजनेअंतर्गत साडेचार कोटी रुपये मंजूर केले. मात्र संबंधित गुत्तेदाराच्या हलगर्जीपणामुळे तिन वर्षानंतर ही काम अपुरेच राहिले असून टाकरवणकरांना भर उन्हाळ्यात पाणी संकटाचा सामना करावा लागत आहे. परिणामी विकतचे पाणी घेऊन तहान भागवावी लागत आहे.

जल जीवन मिशन योजनेतून उभारलेली पाण्याची टाकी पाणी शुद्धीकरणासाठी ऊभारलेले फिल्टर खोदलेली विहीर शोभेची वस्तू बनली आहेत. अनेक घरापर्यंत नळ कनेक्शन पोहचले नाहीत. अनेकांच्या घरी कनेक्शन पोहोचले असले तरीही अद्याप त्याला पाणी येत नसल्याने कोट्यावधीची योजना फोल ठरली आहे. संबंधित गुत्तेदाराने योजनेचे काम बोगस केले आहे व शासनाने दिलेल्या कालावधीत हे पूर्ण झाले नाही त्यामुळे पाणीटंचाईचा सामना करावा लागत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. पाणी प्रश्न गंभीर होत चालला असून या बोगस कामाच्या चौकशीसाठी मानवी हक्क अभियान संघटना व सर्व ग्रामपंचायत सदस्य मा. उपसरपंच श्री. गोबरे दयानंद शिवाजी, ०सर्व ग्रामस्थ १ मे रोजी ग्रामपंचायत कार्यालय टाकरवन समोर बेमुदत धरणे आंदोलन करणार असल्याचे जिल्हाअधीकारी ग्रामिण पाणीपुरवठा विभाग अमदार विजयसिंह पंडित सबंधीत गुत्तेदार यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे.



टाकरवन गावांतर्गत कोणत्याच सार्बजनिक ठिकाणी नळाचे कनेक्शन दिलेले नाही. तरी टाकरवण अंतर्गत सार्वजनिक ठिकाणी नळ कनेक्शन देण्यात यावे. तातडीची पाणी पुरवठा म्हणून टाकरवन गावांतर्गत टँकरद्वारे पाणी उपलब्ध करून ५ देण्यात यावे. पाईपलाईन करताना गावातील सिमेंट रस्त्याचे नुकसान झाले होते ते पूर्ण सिमेंट रस्ते तयार करून देण्यात यावेत जल जीवन मिशन कार्यक्रमांतर्गत मोजे टाकरवन येथील नळ पाणीपुरवठा योजनेची उच्चस्तरीय समिती गठीत करुन चौकशी करण्यात यावी, अशी मागणी मा. उपसरपंच गोबरे दयानंद शिवाजी, ग्रामपंचायत सदस्य डॉ. गायकवाड अंगद बाबुराव, अशोक भगवान खुळे, भुंबे पंढरीनाथ शेषेराव, इनामदार परवीनबी रजाक, सातपुते स्वाती गणेश, काजळे शोभा सुभाष, पटेकर दादासाहेब मुंजाबा, आडागळे जनार्धन मारुती, आडागळे विद्या कपिल या वरील सर्व ग्रामपंचायत उपसरपंच आणि सदस्यांनी मागणी केली.

### १८ महिन्याचा कालावधी मात्र तीन वर्ष होऊनही काम पूर्ण नाही

दि.२८ मार्च २०२२ रोजी मा. कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, जिल्हा परिषद बीड, ने कार्यारंभ आदेश दिला. दिलेला आदेश जल जीबन मिशन कार्यक्रम तिर्गत मोजे टाकरवन तालुका माजलगाव जिल्हा बीड येथील नळ पाणीपुरवठा योजनेच्या कामाबाबत होता. या कार्यारंभ आदेश मध्ये नळ पाणी पुरवठा योजना ही १८ महिन्यांच्या कालावधीत करण्याचे आदेश दिलेले होते. परंतु आज रोजी तीन वर्ष पूर्ण झालेली आहेत तरीही नळ पाणीपुरवठा योजना अपुरीच आहे. असे दिलेल्या निवेदनात म्हटले आहे.

### जिल्हाधिकाऱ्याकडे तक्रार करूनही कारवाई नाही

टाकरवन येथे राबवलेली पाणीपुरवठा योजना बोगस भ्रष्ट असून पावणे पाच कोटी खर्चुन ही गावकऱ्यांना पाणी भेटत नाही. इस्टिमेट नुसार काम न झाल्याने पाणी टंचाईचा सामना करावा लागत आहे. एक महिन्यापूर्वी जिल्हाधिकारी कार्यालय बीड पाणीपुरवठा विभाग यांना निवेदनातुन तक्रार केली होती मात्र अद्यापही कोणतीही कारवाई झाली नसल्याने व पाणी प्रश्न गंभीर बनत चालल्याने धरणे आंदोलन करण्याचा निर्णय घेतला आहे.

कपील आडागळे, तालुका सचिव,
मानवी हक्क अभियान, माजलगाव

# बाबासाहेब आगे यांच्या कुटुंबाची जबाबदारी ना. पंकजा मुंडेंनी स्विकारली

बीड । प्रतिनिधी

भाजपचे लोकसभा विस्तारक बाबासाहेब आगे यांच्या निर्घृण हत्येनंतर त्यांच्या कुटुंबाची जबाबदारी राज्याच्या पर्यावरण व वातारणीय बदल तसेच पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी स्विकारली आहे. आगे यांच्या हत्येने मन सुन्न झाले, एक धडाडीचा कार्यकर्ता मी गमावला आहे अशा शब्दांत त्यांनी आपल्या शोक भावना व्यक्त केल्या आहेत.



बाबासाहेब आगे यांची निर्घृण हत्या झाल्याची बातमी जेव्हा कानावर आली, ते ऐकून मन सुन्न झाले. काहीच सुचत नव्हते, त्यामुळे एका दिवसानंतर ना. पंकजाताई मुंडे यांनी या घटनेवर आपल्या शोक भावना व्यक्त केल्या आहेत. आगे हे भाजपचे धडाडीचे कार्यकर्ते होते, संघाचे संस्कार त्यांचेवर असल्याने प्रत्येकाच्या मदतीला धावून जाण्याचा त्यांचा स्वभाव होता. माझ्या लोकसभा निवडणुकीत बुथ विस्तारक म्हणून अतिशय महत्वाची जबाबदारी त्यांनी खूप मेहनतीने पार पाडली. अशा मनमिळावू कार्यकर्त्याची अशा प्रकारे निर्घृण हत्या झाली हे ऐकून मनाला खूप वेदना झाल्या. या घटनेचा मी तीव्र निषेध करते. जिल्ह्यात आल्यानंतर पहिल्यांदा त्यांच्या पत्नी व कुटुंबाची भेट घेणार आहे. त्यांच्यावर कोसळलेल्या दुःखात माझा परिवार सहभागी आहे. आगे यांच्या कुटुंबाची जबाबदारी मी घेणार असून त्यांना सर्वतोपरी मदत करेल असं ना. पंकजाताई मुंडे यांनी म्हटलं आहे.

# इडीच्या विरोधात आज बीड जिल्हा काँग्रेसची जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने

बीड । प्रतिनिधी

नॅशनल हेरॉल्ड प्रकरणात काँग्रेस पक्षाच्या नेत्या मा. सोनियाजी गांधी व राहुलजी गांधी यांच्या विरोधात चुकीचे चार्जशीट दाखल करत जाणीवपुर्वक गांधी व काँग्रेस परिवाराच्या विरोधात ई डी ला पुढे करुन भारतीय जनता पार्टीचे हे जुलमी सरकार षडयंत्र रचत असुन या विरोधात आज जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे यांच्या नेतृत्वात बीड जिल्हाधिकरी कार्यालयासमोर निदर्शने करत जिल्हाधिकारी




अविनाश पाठक यांना निवेदन देण्यात आले. यावेळी जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे, प्रदेश सरचिटणीस अमर खानापुरे, गणेश बजगुडे, श्रीनिवास बेदरे, बाळासाहेब ठोंबरे, गणेश राउत, परवेज कुरेशी, महेश बेदरे, मोहसीन शेख, आकाश मस्के, आशिष सोनवणे, सफदार देशमुख, विष्णु मस्के, अमोल पाठक, रामधन जमाले, हनुमान घोडके, ड. विलास मस्के, नितीन जयभय, गणेश जवकर, कादर बाबामिया, शेख जहीर, शेख जमील, शेख खमरोद्दीन आदी पदाधिकारी उपस्थित होते.




# धारूर तहसीलसमोर माकपाची निदर्शने; तहसीलदारला दिले निवेदन

धारूर । प्रतिनिधी

धारूर तहसील समोर मापाचे वतीने विविध मागण्यासाठी निदर्शने करत तहसीलदार यांना मागण्यांचे निवेदन देण्यात आले कार्यकर्त्यांचे घोषणांची तहसील परीसर दणाणुण गेला होता.

दिनांक १५ ४ २०२५ रोजी धारूर तहसील तहसील समोर मा क पा चे वतीने विवीध मागण्या साठी निदर्शने करण्यात आली अंबाजोगाई तालुक्यातील जवळगाव येथे खाजगी कंपनीचे सांगण्या वरून शासनाने गावरान जमिनीतील शेतकऱ्यांन वर केलेल्या अन्यायाच्या विरोधात मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या वतीने निदर्शने करण्यात आली. त्याचबरोबर धारूर तालुक्यातील विवीध गावचे गायरान धारकाच्या नावे सातबारा देण्यात यावे यासाठी निदर्शने आंदोलन करण्यात आले. तहसीलदार यांना मागण्यांचे निवेदन देण्यात आले. या आंदोलनात मापाचे काँ दत्ता डाके, काँ सय्यद रज्जाक, काँ काशीराम डापकर, काँ. डॉ. अशोक थोरात, अँड संजय चोले, मनिषा करपे, मिरा शिंदे सह कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# कृषीमंत्री साहेब तुमचे कर्मचारी शेतकऱ्यांना जिवे मारण्याच्या धमक्या देऊ लागले

नेकनूर । प्रतिनिधी

राज्याचे कृषिमंत्री माणिक कोकाटे यांनी नाशिक येथे शेतकऱ्यांची थट्टा करीत शेतकऱ्यांच्या विरोधात बेताल वक्तव्य केले होते.ते प्रकरण ताजे असतानाच त्यांच्याच विभागाचा कर्मचारी शेतकऱ्यांचा जिवावर उठला आहे काय असा प्रश्न उपस्थित होत आहे.याबाबत वृत्त असे की नेकनूर येथील शेतकरी जयदीप काळे यांच्या फोनवर काल रात्री ११ वाजण्याच्या सुमारास नेकनूर येथे कृषी सहायक या पदावर कार्यरत असलेले विकास बाबुराव मुळे यांचा फोन आला व शिवीगाळ करत तु घाटाच्या खाली ये तुला जिवे मारतो असी धमकी दिली व माझ्या जिवाच बरं वाईट करतो आणि तुझे नाव चिठ्ठी वर लिहीतो अशी धमकी दिली.याप्रकरणी जयदीप नारायण काळे यांच्या फिर्यादीवरून नेकनूर पोलीस ठाण्यात गुन्ह्या नोंद करण्यात आला असून पोलीस पुढील तपास करीत आहेत.

# माळेवाडी (सुलतानपूर) येथील जलजीवन मिशन योजनेत लाखो रुपयांचा भ्रष्टाचार?

### कामाची सखोल चौकशी करून संबंधितावर कारवाई करा

माजलगांव । प्रतिनिधी

प्रत्येकाची तहान भागावी, पाणी टंचाई होऊ नये, पाण्याचा प्रश्न गंभीर आहे हे पाहता शासनाने जलजीवन मिशन ही कोट्यवधी रुपयांची योजना आणली व ती राबवली देखील पण फक्त कागदोपत्रीच, या योजनेचा लोकांना कुठेही फायदा होताना दिसत नाही. यामध्ये कोट्यवधी रुपयांचा भ्रष्टाचार होताना दिसत आहे या मध्ये काही भ्रष्ट अधिकारी पण सामील आहेत त्यामुळे या योजनेचे काम ईस्टीमेट प्रमाणे न करता बोगस निकृष्ट दर्जाचे झालेले आहेत. या योजनेत झालेल्या भ्रष्टाचाराच्या अनेक लोकांनी तक्रारी पण केलेल्या आहेत पण यामध्ये संबंधित गुत्तेदारांकडून अधिकाऱ्यांसोबत आर्थिक तडजोड झाल्यामुळे या तक्रारींकडे कानाडोळा केला जातोय का ? असा प्रश्न उपस्थित होताना दिसत आहे.

तालुक्यातील माळेवाडी (सुलतानपूर ) येथील जलजीवन मिशन अंतर्गत चालू असलेल्या योजनेत लाखो रूपयांचा भ्रष्टाचार केल्याचा आरोप येथील गावकऱ्यांनी केला आहे. या गावातील जल जीवन योजनेचे काम हे मागील दोन वर्षापासून कासव गतीने सुरू असून आतापर्यंत पूर्ण झालेले नाही. यामुळे येथील नागरिकांना पाण्यासाठी वनवन भटकावे लागत आहे पाण्यासाठी त्रास सहन करावा लागत आहे तरीही येथील ग्रामपंचायतला जाग येत नाही. कोट्यवधी रुपये खर्च करून शासनाने हि योजना येथे राबवली पण याचा फायदा ग्रामस्थांना कमी आणि अधिकारी व गुत्तेदार यांनाच होताना दिसत आहे.

जल जीवन मिशनचे काम बोगस रित्या करून बीलं उचलण्यात आलेले आहेत. हे काम इस्टिमेट प्रमाणे केलेले नसून या कामांमध्ये लाखो रूपयांचा भ्रष्टाचार झालेला आहे असा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. त्यामुळे या कामाची तात्काळ सखोल चौकशी करून कारवाई करण्यात यावी अशी मागणी करण्यात येत आहे. कारवाई न झाल्यास गावकऱ्यांच्या वतीने तीव्र आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

# किल्ले धारूर तालुका क्रीडा संकुलनाचा मुहूर्त कधी लागणार?

## कित्येक वर्षापासून काम अर्धवट अवस्थेत तर क्रीडा कार्यालयाला अनेक वर्षापासून कुलूप

धारूर । प्रतिनिधी

किल्ले धारूर तालुका क्रीडा संकुल हे खेळाडू साठी सर्व काही आहे कारण धारूर तालुक्यातील क्रीडा प्रेमिंना कित्येक वर्ष झाले तरी हक्काचे असलेले क्रीडा संकुल हे काम अर्धवट अवस्तेत असल्यामुळे त्याचा काही उपयोग होत नसल्याने क्रीडा प्रेमिंना मध्ये तीव्र नाराजी पाहण्यास मिळत आहे कारण एक तर क्रीडा मैदान नाही त्यात तालुका क्रीडा अधिकारी ही कायम स्वरूपी धारूर तालुक्याला रुजू नाही त्या मुळे धारूर तालुक्यातील क्रीडा प्रेमीची मनामध्ये होत असलेली नाराजी ते कोना पुढे जाऊन सांगणार कारण गेली कित्येक वर्षपासून धारूर क्रिडांगणा चे काम पूर्ण होण्याची वाट पाहत आहेत.




त्यामध्ये अजून तरी अर्धवट राहिलेले काम चालु झालेले नाही तसेच काही खेळाडूंच्या भावना ओळखून काही खेळ प्रेमी पत्रकार मित्रानी जिल्हा क्रीडा अधिकारी यांच्याशी दूरध्वनी वरून संपर्क साधला असल्यास त्यांनी माहिती दिली की चार ते पाच महिन्यापूर्वी धारूर तालुक्याला प्रभारी क्रीडा अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आलेली आहे व पुढे विचारले असल्यास ते फक्त क्रीडा संकुलनाचे काम पाहणार आहेत त्यानंतर धारूर तालुका प्रभारी क्रीडा अधिकारी यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क साधला असल्यास त्यांनी मी आठ ते पंधरा दिवसात तालुका क्रीडा संकुलणाला भेट देऊन लवकरात लवकर काम चालू करणार असल्याची माहिती दिली.

चार ते पाच महिन्यापूर्वी त्यांची नियुक्ती प्रभारी क्रीडा अधिकारी म्हणून झालेली आहे त्यामुळे धारूर तालुका क्रीडा संकुलना चे काम लवकरात लवकर सुरू होईल असे आता तरी वाटते कारण क्रीडांगण नसल्यामुळे युवा पिढी ही खेळाच्या मैदानापासून दूर झालेली आहे आता तरी असे दिसून येत आहे की फक्त आणि फक्त ते मोबाईल मध्येच गेम खेळत असल्याचे चित्र आहेत त्यामुळे त्यांच्या शरीरावरती बुद्धी वरती विपरीत परिणाम होत असल्याचे पालक वर्गातून सांगण्यात येत आहे कारण मोबाईल मध्ये व्हिडिओ गेम मुळे डोळे खराब होतात व विद्यार्थ्यांच्या बुद्धी वरती दुष्परीनाम होतात व ते निरोगी राहू शकत नाही मैदानी खेळ नसल्यामुळे त्यांना अनेक रोग सुद्धा लवकर होऊ शकतात मैदानी खेळामुळे शरीर रचना ही निरोगी राहते तसेच शरीर हे सदृढ निरोगी होते व खेळाची आवड असल्यास विद्यार्थी पुढे खेळाच्या माध्यमातून आपल्या भविष्याची उज्वल निवड ही करू शकतात जसे की कबड्डी, खोखो, भालाफेक, थाळीफेक, गोळाफेक, रनिंग कुस्ती, हॉकी व अनेक खेळांमध्ये आपले व आपल्या पाल्यांचे नावलौकिक करू शकतात त्यामुळे लवकरात लवकर तालुका क्रीडा मैदान चालू करण्यात यावे अशी क्रीडा प्रेमींची मनापासून इच्छा आहे त्यामुळे लवकरात लवकर लोक प्रतिनिधी ने धारूर तालुका क्रीडा गमैदान चालू करण्यासाठी प्रयत्न करावेत अशी मनापासून खेळाडूंची इच्छा आहे.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT